लोकआरंभ

# कृषी विज्ञान केंद्र सुवर्ण सप्ताह निमित्त कृषी संवाद प्रशिक्षण व मेळाव्याचे आयोजन

**नांदेड प्रतिनिधी :**
**बालाजी सिरसाट**

नांदेड : जे.एन.आय.इ. एस.टी. आर नांदेड, महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान केंद्र पोखरणी येथे सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त "शेतकरी संवाद व प्रशिक्षण आठवडा"साजरा करण्यात येत असून सदरील कार्यक्रम नांदेड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये विधानसभा आणि लोकसभा सदस्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात येणार आहे. शेतकरी आणि शास्त्रज्ञ संवादामध्ये कृषी विज्ञान केंद्राची कार्यप्रणाली,उद्दिष्टे ,नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान व राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देखील शास्त्रज्ञांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमात जि.अ. कृ. अधिकारी उ. कृ.अधिकारी नांदेड,किनवट व ता.कृ.अधिकारी हदगाव,किनवट,भोकर व अर्धापूर यांचे देखील शासनाच्या राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती व त्यासंबंधीचे शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन लाभणार आहे.तरीही शेतकऱ्यांनी कृषी विज्ञान केंद्र परिवाराअंतर्गत राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमाचा घ्यावा असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र पोखरणी नांदेड परिवारातर्फे करण्यात येत आहे.